नि.दि.दावा क्र. १०९२/२०२१
निशाणी क्र. २८

**निशाणी क्र. २८ खालील आदेशः–**
**( CNR NO.MHLA140032612021 )**

प्रस्तूत अर्ज हा प्रतिवादी क्र.०१, ०२ व ०४ यांनी त्यांचेविरुध्द नि.क्र. ०१ वर झालेला विना कैफियतचा आदेश रद्द व्हावा यासाठी केलेला आहे. त्यावर वादीने दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रतिवादींच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र.०१ हा सतत आजारी असल्यामुळे व कागदपत्र मुदतीत न मिळाल्यामुळे प्रतिवादींना कैफियत वेळेवर दाखल करता आलेली नाही. प्रतिवादींनी जाणून–बुजून कैफियत देणेस उशीर केलेला नाही. प्रतिवादींविरुध्द झालेला विनाकैफियतचा हुकूम रद्द न झाल्यास त्यांचे कधीही व कशानेही भरुन न येणारे अपरिमित नुकसान होणार आहे.

०३. वादीच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादींनी जाणूनबुजून दाव्यात कैफियत वेळेवर दाखल केलेले नाही. सबब प्रस्तूतचा अर्ज खर्चासह रद्द व्हावा.

०४. प्रतिवादींनी मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार प्रत्येक दाव्यात गुणदोषावर चौकशी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असते. अशा चौकशीसाठी पक्षकारांचे म्हणणे दाखल होणे व त्यांची योग्य बाजू मांडणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे प्रतिवादींना त्यांची बाजू मांडण्याची संधी

मिळणे न्यायोचित आहे. प्रतिवादींनी सुमारे २ महिन्याच्या विलंबाने अर्ज केला आहे.  सबब खालीलप्रमाणे आदेश.

**आदेश**

१. अर्ज **नि.क्र.२८** मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.०१, ०२ व ०४ विरुध्द वादपत्र नि.क्र.०१ वर झालेला विनाकैफीयतचा आदेश त्यांनी वादीला खर्च प्रत्येकी रक्कम रुपये ५०/– देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

स्वाक्षरीत/–

औसा. (एस. एल. फुले)

दिनांकः– २१/०६/२०२२ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर., औसा.